# Umed-Maharashtra State Rural Livelihoods Mission
# उमेद-महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान

राज्य अभियान व्यवस्थापन कक्ष,
सिडको भवन, ५ वा मजला (दक्षिण बाजु)
सी. बी. डी. बेलापूर, नवी मुंबई
पिनकोड : ४००६१४
दुरध्वनी : ०२२-२७५६२५५२/५४

State Mission Management Unit
CIDCO Bhavan, 5th Floor (South wing),
C.B.D. Belapur, Navi Mumbai
Pin Code : ४००६१४
Phone : ०२२ - २७५६२५५२/५४

उमेद-एमएसआरएलएम/HR/3788/२०१८ दि.26/१०/२०१८

प्रति,
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद तथा
जिल्हा अभियान संचालक,
महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (सर्व इंटेन्सिव्ह जिल्हे)

**विषय : महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत जिल्हास्तरावर करार तत्वावर कार्यरत सहाय्यक कर्मचारी व क्लस्टर कॉर्डीनेटर यांच्या मुल्यांकन व करार नूतनीकरणाबाबत**

महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत राज्यात २६ जिल्ह्यामध्ये इंटेन्सिव्ह व उर्वरित ८ जिल्ह्यामध्ये नॉन- इंटेन्सिव्ह व सेमी- इंटेन्सिव्ह पद्धतीने राबविण्यात येत आहे. सद्यस्थितीत अभियानांतर्गत सर्व अधिकारी/कर्मचारी यांच्या कराराचे नुतनीकरण राज्य स्तरावरून करण्यात येत होते.

अभियानांतर्गत जिल्हास्तरावर कार्यरत सहाय्यक कर्मचारी तसेच क्लस्टर कॉर्डीनेटर यांची भरती प्रक्रिया जिल्हास्तरावरून होते. क्लस्टर कॉर्डीनेटर व सहाय्यक कर्मचाऱ्यांच्या कामाचे मूल्यांकन त्यांचे प्राथमिक पर्यवेक्षीय अधिकारी व पुनर्विलोकन जिल्हा अभियान व्यवस्थापक यांच्या स्तरावर होते. त्यामुळे जिल्हास्तरावर क्लस्टर कॉर्डीनेटर व सहाय्यक कर्मचाऱ्यांच्या कामाचे मुल्यांकन करून त्यांना पुनर्नियुक्ती देताना त्यामध्ये प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा तथा जिल्हा अभियान सहसंचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद तथा जिल्हा अभियान संचालक यांचा सहभाग असणे महत्वाचे आहे. या अनुषंगाने ऑनलाईन HRIS कार्यान्वित होईपर्यंत जिल्हास्तरावर क्लस्टर कॉर्डीनेटर व सहाय्यक कर्मचाऱ्यांच्या कामाचे मुल्यांकन करून त्यांना पुनर्नियुक्ती देण्याबाबतची कार्यवाही करण्यात यावी. ऑनलाईन HRIS कार्यान्वित झाल्यानंतर स्वतंत्र सूचना निर्गमित करण्यात येतील.जिल्हास्तरावरून कर्मचाऱ्यांच्या पुनर्नियुक्तीसाठी खालील तक्त्यामध्ये दर्शविल्याप्रमाणे मुल्यांकन करण्यात यावे.

| Level | Position | Appraiser | Reviewer | Remarks |
|---|---|---|---|---|
| District Mission Management Unit | Admin Assistant | Office Superintendent | District Mission Manager | District Mission Joint-Director & District Mission Director |
| | Data Entry Operator | Office Superintendent | District Mission Manager | District Mission Joint-Director & District Mission Director |
| | Accountant | Accounts Officer | District Mission Manager | District Mission Joint-Director & District Mission Director |
| | Attendant | Office Superintendent | District Mission Manager | District Mission Joint-Director & District Mission Director |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| Block Mission Management Unit | Cluster Coordinator | Block Mission Manager | District Mission Manager | District Mission Joint-Director & District Mission Director |
| | Admin & Accounts Assistant | Block Mission Manager | District Mission Manager | District Mission Joint-Director & District Mission Director |
| | Data Entry Operator | Block Mission Manager | District Mission Manager | District Mission Joint-Director & District Mission Director |
| | Attendant | Block Mission Manager | District Mission Manager | District Mission Joint-Director & District Mission Director |

जिल्हा व तालुका स्तरावरील सहाय्यक कर्मचारी व क्लस्टर कॉर्डीनेटर यांच्या करार नुतनीकरणाबाबत कार्यवाही करणे आवश्यक असून सर्वप्रथम कर्मचा-याने स्वतः आपला KRA/KPI भरून Appraiser कडे सादर करावा. Appraiser त्यांचा KRA/KPI मध्ये कर्माचा-याबाबत अभिप्राय नोंदवून Reviewer कडे सादर करावा व त्यानंतर जिल्ह्य अभियान सहसंचालक व जिल्हा अभियान संचालक यांनी अभिप्राय द्यावा. सदर प्रक्रियेनुसार ज्या कर्मचाऱ्याला ६०%किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळतील त्यांना ११ महिन्यांसाठी पुनर्नियुक्ती देण्यात यावी व ज्या कर्मचाऱ्याला ६०%पेक्षा कमी गुण मिळाले असतील त्यांच्याबाबत Appraisaer किंवा Reviewer किंवा जिल्हा अभियान संचालक किंवा जिल्हा अभियान सहसंचालक यांनी Call for Review असे लिहिल्यास किंवा ११ महिन्यापेक्षा कमी कालावधीसाठी पुनर्नियुक्ती प्रस्तावित केल्यास त्यांचे जिल्हास्तरावर Performance Appraisal Review करण्यात यावे. यासाठी खालीप्रमाणे जिल्हास्तरीय Performance Appraisal Review समिती राहील.

| | | |
|---|---|---|
| १. | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद तथा जिल्हा अभियान संचालक | : अध्यक्ष |
| २. | प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा तथा जिल्हा अभियान सहसंचालक | : सदस्य |
| ३. | जिल्हा अभियान व्यवस्थापक, जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष | : सदस्य-सचिव |
| ४. | कार्यालयीन अधीक्षक तथा जिल्हा व्यवस्थापक-संपादणूक, जिल्हा अधियान व्यवस्थापन कक्ष | : सदस्य |
| ५. | संबधित तालुक्याचा तालुका अभियान व्यवस्थापक | : सदस्य |

वरील समितीमार्फत संबधित उमेदवार व त्याचे पर्यवेक्षीय अधिका-याचे म्हणणे ऐकून घेण्यात यावे. यासाठी संबधित कर्मचा-याची वैयक्तिक मुलाखत घेऊन पत्रासोबत जोडलेल्या प्रपत्रामध्ये सर्व समिती सदस्यांनी स्वतंत्रपणे गुणदान करावे. सर्व समिती सदस्यांच्या गुणाची सरासरी काढण्यात यावी. संबधित उमेदवारास जर सरासरी ७५ गुणांपेक्षा जास्त गुण प्राप्त झाल्यास उमेदवारास ११ महिन्यासाठी पुनर्नियुक्ती देण्यात यावी. जर उमेदवारास ५० ते ७४.९९ एवढे गुण प्राप्त झाल्यास त्याच्याकडून तीन महिन्याचा Performace Improvement Plan सादर करण्याबाबत सूचित करावे व त्यास तीन महिन्यासाठी पुनर्नियुक्ती देण्यात यावी. जर उमेदवारास ५० गुणांपेक्षा कमी गुण प्राप्त झाले तर त्यास अभियानातून कार्यमुक्त करण्यात यावे. सदर समितीच्या बैठकीचे सविस्तर इतिवृत्त तयार करून त्यास मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद तथा जिल्हा अभियान संचालक यांची मान्यता घेण्यात यावी.

जर कर्मचा-यास तीन महिन्यासाठी पुनर्नियुक्ती दिली असेल तर, तीन महिन्यांनी त्यांच्या कामाचे मुल्यांकन करण्यात यावे. सदर कर्मचाऱ्याने Performace Improvement Plan नुसार त्यांना निश्चित करून

दिलेल्या उद्दिष्ट्यांची पूर्ती केली आहे व त्यांचे काम समाधानकारक असल्यास त्यांना पुढील ८ महिन्यासाठी पुनर्नियुक्ती देण्यात यावी. संबधितांचे काम जर असमाधानकारक असल्यास त्यांना कार्यमुक्त करण्यात यावे.

तरी, उपरोक्त प्रमाणे जिल्ह्यामधील कार्यरत सहाय्यक कर्मचारी व क्लस्टर कॉर्डीनेटर यांच्या कराराचे नूतनीकरण विहित कालावधीत करण्याबाबत आपल्या स्तरावरून योग्य ती कार्यवाही करण्यात यावी. तसेच जिल्हास्तरावर करार तत्वावर सद्यस्थितीत कार्यरत ज्या सहाय्यक कर्मचारी व क्लस्टर कॉर्डीनेटर यांच्या करार कालावधीसाठी सप्टेंबर २०१८ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती तसेच ज्यांचे करार ऑक्टोंबर २०१८ मध्ये संपुष्टात येत आहेत त्यांना ३१ ऑक्टोंबर २०१८ पर्यंत मुदतवाढ देण्यात यावी.

25/10

आर. विमला भा.प्र.से
मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान

प्रत:
१. प्रकल्प संचालक जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा तथा जिल्हा अभियान सहसंचालक, सर्व इंटेन्सिव्ह जिल्हे
२. जिल्हा अभियान व्यवस्थापक, जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष, सर्व इंटेन्सिव्ह जिल्हे